रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २१४
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

उरण शहराच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध/३
रायगडात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार!/५
रेवदंड्यातील रो-रो जेट्टीच्या कामास प्रारंभ/७

## ‘शिवरायांनी दाखवलेला मार्ग हाच विकासाचा खरा मार्ग’



**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली शिवरायांची ४००वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. किल्ले शिवनेरीवर गुरुवारी (दि.१९) आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते. या वेळी पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून शिवरायांना मानवंदना दिली.

# आजपासून उलवेतील रामशेठ ठाकूर मैदानावर रंगणार कबड्डीचा थरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्ताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोडमध्ये रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि. २०) सकाळी ११ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार आहे. उलवे नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेलच्या उपमहापौर प्रमिला पाटील यांची, तर शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे व सूर्यकांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा रविवारी (दि. २२) सायंकाळी ६ वाजता पनवेलचे महापौर नितीन



पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांची, तर अर्जुन पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर व अभिलाषा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. आगामी राज्यस्तरीय स्पर्धेच्या धर्तीवर जिल्ह्याचा संघ निवड करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धेत जिल्ह्यातील १९८ पुरुष आणि ३२ महिला संघ सहभागी होणार आहेत. यातून निवडलेल्या खेळाडूंचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेत रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने जवळपास १०० पंच कार्यरत असणार आहेत. सुसज्ज अशी चार क्रीडांगणे त्याचबरोबर मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर पूरक सुविधा या ठिकाणी आहेत. या स्पर्धेचा कबड्डीरसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्राताई पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा संयोजन समितीचे सचिव शरद कदम यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये शिवशाही अवतरली!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’च्या घोषणा देत, ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर संपूर्ण पनवेल नगरी गुरुवारी (दि. १९) दुमदुमली. निमित्त होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६व्या जयंती सोहळ्याचे. महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून आयोजित करण्यात आलेल्या भव्य-दिव्य मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या शिवजयंती सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मिरवणुकीची सुरुवात सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि महाराष्ट्र गीताच्या गायनाने झाली. पारंपरिक वेशभूषेतील महिला, पुरुष आणि विद्यार्थ्यांनी या मिरवणुकीत उत्साहाने सहभाग नोंदवला. शिवरायांच्या जीवनचरित्रातील प्रसंगांवर आधारित सात चित्ररथ, विविध शाळांची १४ लेझीम पथके, ढोल आणि बॅन्जो पथके हे या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. मिरवणुकीच्या मार्गावर पाच वेगवेगळ्या ठिकाणी दांडपट्टा, तलवारबाजी आणि लेझीम अशा शिवकालीन मैदानी खेळांचे थरारक सादरीकरण करण्यात आले, ज्याने उपस्थित जनसमुदायाची मने जिंकली.



भव्य मिरवणुकीने शिवजयंती उत्साहात



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

अश्वारूढ शिवपुतळ्यापासून मिरवणूक सुरू होऊन हुतात्मा स्मारक, लाईन आळी, गावदेवी मंदिर आणि महापालिका कार्यालय या मार्गे टपाल नाका येथील अर्धाकृती पुतळ्याजवळ विसर्जित झाली. त्यानंतर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मुख्य सोहळा पार पडला. या ठिकाणी शाहीर यशवंत जाधव यांच्या पहाडी आवाजातील पोवाड्याने आणि महापालिका मालमत्ता कर विभागाने सादर केलेल्या शिवराज्याभिषेक नाटकाने संपूर्ण वातावरण शिवमय झाले. विशेष म्हणजे, या नाटकात उपायुक्त स्वरूप खारगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका अतिशय प्रभावीपणे साकारली.

याच कार्यक्रमात पनवेल महापालिकेच्या यशाचा गौरव करण्यात आला. माझी वसुंधरा ५.० अभियानात राज्यात सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल आणि ई-गव्हर्नन्समध्ये सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

लोकसहभागातून साजरा झालेल्या या उत्सवासाठी महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर व माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांची रक्कम दिली, त्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. (पान २ वर..)

### स्वराज्याचा वारसा जपूया -आमदार प्रशांत ठाकूर

छत्रपती शिवाजी महाराजांनी जागवलेले स्वराज्य पुढेही कायम राहिले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिवजयंती उत्सवात केले. येथील महापालिका ही तुलनेने नवीन असली तरी आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेलचे नाव जागतिक स्तरावर पोहचले आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या महापालिकेचा नावलौकिक अधिक वाढावा यासाठी सर्व क्षेत्रांत प्रभावी काम करण्याची गरज असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

महापालिकेला मिळालेल्या विविध पुरस्कारांबद्दल त्यांनी शिवरायांचा आदर्श आपण डोळ्यापुढे ठेवून आपण काम करत आहात, असे सांगत आयुक्त मंगेश चितळे, महापौर नितीन पाटील तसेच संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.



## शिवरायांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारण्यासाठी भूखंड न दिल्यास सिडको आणि आमदारांच्या घरावर मोर्चा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा इशारा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

सिडकोने देवस्थानाच्या संस्थांना नाममात्र दरात भूखंड दिले आहेत; त्याचप्रमाणे उलवे नोडमध्ये अटल सेतूजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारण्यासाठी भूखंड न दिल्यास सिडको आणि आमदारांच्या घरावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १९) उलवे नोड येथे दिला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवरायांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती गव्हाणच्या वतीने उलवे नोड येथे भव्य उत्सव झाला. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अपरिमित त्याग केला. त्यामुळे शिवरायांची जयंती साजरी करणे आपले कर्तव्य आहे. उलवे नोडमध्ये महाराजांचा अश्वारूढ पुतळा व शिवसृष्टी उभारणीसाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीची २०१८मध्ये स्थापना करण्यात आली आणि त्या अनुषंगाने छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी गेली अनेक वर्षे पाठपुरावा करूनही सिडको या पवित्र कार्यासाठी भूखंड देत नाही, उलट या समाजोपयोगी भूखंडासाठी सिडको पाच कोटी रुपये आपल्याकडून मागत आहे. त्यामुळे सिडकोच्या या भूमिकेचा धिक्कार व्यक्त करत आहे. सरकार सहानुभूतीशीर आहे, पण सिडकोचे अधिकारी हे झारीतले शुक्राचार्य आहेत. तिरुपती मंदिरासाठी फक्त एक रुपये दराने जागा दिली गेली आहे, पण आपल्याकडून मात्र पैशांची मागणी केली जात आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे कार्य अत्यंत पवित्र असून कोणत्याही अडथळ्यापासून ते रोखले जाऊ नये. हा महाराष्ट्राचा आणि संपूर्ण देशाचा गौरव आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२७पर्यंत भूखंड मिळाला नाही, तर सिडको; त्याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या घरावर मोर्चा काढू, असे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले.

यावेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले की, जगाचे मॅनेजमेंट गुरू म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. शिवरायांचा जगालाही सार्थ अभिमान आहे. (पान २ वर..)

## धुळ्यामध्ये हळदी समारंभात तिघांची हत्या

**पिंपळनेर :** धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथे एका विवाह सोहळ्याच्या हळदी समारंभात झालेल्या तुंबळ हाणामारीत तीन जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नवरदेवाच्या बाजूकडील लोकांनी केलेल्या मारहाणीत नवरीकडील तीन व्यक्तींना जीव गमवावा लागला. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

गोसावी समाजाचा हळदीचा कार्यक्रम सुरू असताना नवरदेव आणि नवरीकडील पाहुण्यांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर बघता-बघता हिंसक हाणामारीत झाले. नवरदेवाच्या बाजूने आलेल्या काही तरुणांनी नवरीकडील मंडळींवर हल्ला चढवला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सुरेश सुपडुगिर गोसावी, साहील सुरेशगिर गोसावी आणि देवा रवींद्र पवार (रा. तिघेही साक्री) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## राज्यात आजपासून दहावीची परीक्षा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतली जाणारी दहावीची परीक्षा शुक्रवार (दि. २०)पासून सुरू होत आहे. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी राज्यात १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून शेवटचा पेपर १८ मार्च रोजी आहे.

परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी आठ लाख ६५ हजार ७४० मुलगे, सात लाख ४९ हजार ७३६ मुली, तर १३ तृतीयपंथी आहेत. परीक्षेसाठी राज्यातील २३ हजार ६८३ शाळांमधून नोंदणी पूर्ण झाली आहे. राज्यभरातील ५११९ केंद्रांवर परीक्षा घेतली जाईल.

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल
आणि
रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन
यांच्या संयुक्त विद्यमाने
लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब (माजी खासदार)
यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित
लोकनेते श्री रामशेठ ठाकूर ७५ अमृत महोत्सव



रायगड जिल्हा अजिंक्य पद महिला आणि पुरुष गटाची निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२६

उद्घाटन समारंभ
शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वा.
* उद्घाटक *
मा. आमदार. श्री. महेश बालदी (आमदार, उरण)
* अध्यक्ष *
लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब (माजी खासदार)
* प्रमुख पाहूणे *
मा. श्री. जे. एम. म्हात्रे — मा. नगराध्यक्ष प.न.पा.
मा. श्री. अविनाश कोळी — अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भा.ज.पा.
मा. सौ. प्रमिला रवीनाथ पाटील — उपमहापौर, पनवेल महानगरपालिका
* प्रमुख उपस्थिती *
मा. श्री.प्रमोद म्हात्रे — श्री. शिव छत्रपती पुरस्कार विजेते
मा. श्री. सुर्यकांत ठाकूर — श्री. शिव छत्रपती पुरस्कार विजेते

पारितोषिक वितरण समारंभ
रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं ०६.०० वा.
* शुभहस्ते *
मा. श्री. नितीन पाटील (महापौर, पनवेल महानगरपालिका)
* अध्यक्ष *
मा. श्री. प्रितम म्हात्रे (मा. विरोधी पक्ष नेते, पनवेल महानगरपालिका)
मा. श्री. आस्वाद पाटील (माजी सरकार्यवाह, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन)
* प्रमुख उपस्थिती *
मा. सौ. शकुंतला खटावकर — अर्जुन अवॉर्ड विजेती
मा. सौ. अभिलाषा म्हात्रे — अर्जुन अवॉर्ड विजेती

* आपले स्नेहांकित *
आमदार श्री. प्रशांत ठाकूर — अध्यक्ष, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल.
मा. सौ. चित्राताई पाटील — कार्यवाह, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन
मा. श्री. परेश ठाकूर — सेक्रेटरी
मा. श्री. अरुणशेठ भगत — उपाध्यक्ष
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल.
मा. श्री. शरद कदम — ऑरगनायझींग सेक्रेटरी, अंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक



* स्थळ * रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं. ६, सेक्टर १२, खारकोपर स्टेशनजवळ, उलवे.

# रायगडात शिवजयंती उत्साहात; ठिकठिकाणी मिरवणुका




**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज (गुरूवार) रायगड जिल्हयात मोठया उत्साही वातावरणात साजरी झाली. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ठिकठिकाणी मिरवणूका काढण्यात आल्या. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष सुरू होता. भगवे झेंडे आणि पोवाडे यांनी वातावरण शिवमय झाले होते.

अलिबाग शहरासह ठिकठिकाणी विविध मंडळांनी शिवजयंती साजरी केली. ठिकठिकाणी शिवपुतळयाचे पूजन, अभिवादन यासह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजाच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अलिबाग एसटी स्थानकात शिवजयंती निमित्त अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या हस्ते शिवपुतळयाचे पूजन आणि आरती करण्यात आली. विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी सहभागी झाले होते. शिवपराक्रमाचे पोवाडे, भगवे झेंडे, भगवे फेटे यामुळे वातावरण भारावून गेले होते.

संध्याकाळच्या सुमारास अलिबाग शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. मावळा प्रतिष्ठान, गाज फाऊंडेशन आणि मनस्विनी चॅरीटेबल यांनी संयुक्तपणे आयोजीत केलेल्या या उपक्रमात अलिबागकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ब्राह्मण आळी येथील श्रीराम मंदिरापासून निघालेल्या या मिरवणूकीची अलिबाग शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा असलेल्या जोगळेकर नाका येथे समारोप झाला. ढोलताशांच्या गजरात कवायती, मैदानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. वेगवेगळया चित्ररथांच्या माध्यमातून शिवरायांच्या जीवनातील प्रसंग सादर करण्यात आले. महिला, पुरुष लहान मुले यात पारंपारिक वेषात सहभागी झाले होते. भगव्या झेंडयामुळे वातावरण भारावून गेले होते.

जिल्हाधिकारी कार्यालयातदेखील शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. किल्ले रायगडावरही शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. रायगड पोलीस दलातर्फे शिवरायांना मानवंदना देण्यात आली.



**पाली : प्रतिनिधी**

दुर्गवेध परिवार आयोजित दोन दिवसीय किल्ले सरसगड शिवजन्मोत्सव सोहळ्याला (वर्ष ९ वे) बुधवारी शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. पाली शहरातून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने या सोहळ्याचा दिमाखदार शुभारंभ झाला. ढोल-ताशांचा गजर आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने पाली शहर दुमदुमून गेले होते.

कार्यक्रमाची सुरुवात पाली येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून झाली. यावेळी तहसीलदार उत्तम कुंभार, नगराध्यक्ष पराग मेहता, माजी नगराध्यक्ष आरिफ मणियार, पोलीस निरीक्षक श्री. निकम, शिवऋण प्रतिष्ठानचे केतन म्हस्के, उमेश मढवी यांसह दुर्गवेध परिवाराचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला मानवंदना देण्यात आली.

या मिरवणुकीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सरसगड संवर्धन मोहिमेदरम्यान उजेडात आलेल्या ऐतिहासिक पुराव्यांचे आणि किल्ल्याच्या इतिहासाचे 'कार्डबोर्ड प्रदर्शन' होय. संवर्धन कार्यात मिळालेले अवशेष आणि महत्त्वाच्या ऐतिहासिक नोंदी फलकांच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात आल्या होत्या. या अभिनव उपक्रमामुळे उपस्थित नागरिकांना आणि विशेषतः तरुणांना सरसगडच्या गौरवशाली इतिहासाची सखोल माहिती मिळण्यास मदत झाली.

संवर्धनासाठी साद दुर्गवेध परिवाराच्या वतीने या मिरवणुकीच्या माध्यमातून पालीतील तरुण पिढीला आणि ग्रामस्थांना किल्ले सरसगडच्या संवर्धन कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. आपला वारसा जपणे हे आपले कर्तव्य आहे. हा संदेश या निमित्ताने घराघरात पोहोचवण्यात आला. या सोहळ्याच्या निमित्ताने पाली शहरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.



**माणगाव : छत्रपती शासन शिवजयंती उत्सव समिती माणगाव यांच्यातर्फे शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची माणगाव बाजारपेठेतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी झाले होते. आलेल्या सर्व शिवप्रेमींचे समितीचे अध्यक्ष डॉ.परेश उभारे व सहकारी यांनी स्वागत केले.**
(छाया : सलीम शेख)



**कर्जत :** तालुक्यात विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी जिजाऊंची, शिवाजी महाराजांची, मावळ्यांची वेशभूषा करून पोवाडे, शिवकालीन प्रसंग सादर केले. कर्जत शहरातील सर्वात जुन्या असलेल्या छत्रपती शिवाजी मंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सव आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी नगरसेवक राजाभाऊ कोठारी, रोहित ओसवाल यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, दीपक जाधव, अरुण विशे, राजेश मोरे, हरिश्चंद्र राऊत, दिनेश दगडे, मोहन भोईर, महेंद्र शेलार, मनोज वरसोलीकर योगेश शेलार, पप्पू दानवे, यश ठाकरे, राम ठाकरे, मंगेश पाटील आदी उपस्थित होते.

याप्रसंगी उपगराध्यक्ष संतोष पाटील, बांधकाम समिती सभापती महेंद्र चंदन, नगरसेवक प्रशांत पाटील, राजाभाऊ कोठारी, रोहित ओसवाल यांचा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्ध पुतळा, शाल, पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. राजेश मोरे यांनी, ' मंडळाला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. मंडळाच्या वतीने पन्नास वर्ष रंगावली प्रदर्शन, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, श्री हनुमान जयंती, गोपाळ काला, नामवंतांची व्याख्याने, आरोग्य शिबीरे आदी उपक्रम राबविले जातात. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र सुद्धा सुरु केले असून प्रत्येक गुरुवारी धार्मिक कार्यक्रम केले जातात.' असे स्पष्ट केले.



**रोहा : प्रतिनिधी**

श्री राम मारुती चौक ते कुंडलिका नदी संवर्धन गार्डन पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने भव्य रॅली रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या वतीने काढण्यात आली होती.

भव्य स्वरूपात रोहा शहरातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने मिरवणूक काढण्यात आली.भव्य रथातुन व पालखीतुन मिरवणूक खालु बाजा, ढोल, ताशा, लेझीम नृत्य वर काढण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात भगवे ध्वज घेतले होते

या रॅलीत माजी आमदार अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, महेंद्र दिवेकर, रवींद्र चाळके, निता हजारे, गौरी बारटक्के, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष समिर शेडगे, शहर अध्यक्ष अमित उकडे, नगरसेवक, रोहा अष्टमी नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, रोहेकर नागरिक व शिवप्रेमी सहभागी झाले होते. या रॅली दरम्यान रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून रॅलीमध्ये सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांनी शिवकालीन मर्दानी खेळ, लेझीम अशा अनेक कवायती सादर केले. लहान मुलांनी शिवकालीन मर्दानी खेळ सादर केले. या खेळाचे सर्वांनी कौतुक केले.शहरातील नागरिक पारंपरिक वेशभूषा परिधान करून या रॅलीत सहभागी झाले होते. संपूर्ण रोहा शहर शिवमय झाले होते.

## साईबाबांच्या पादुकांचे पनवेलमध्ये आगमन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिर्डी येथील श्री साईबाबांच्या पवित्र पादुकांचे बुधवारी पनवेलमध्ये मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. निमित्त होते सद्गुरू श्री साई नारायणबाबा यांच्या ९०व्या जयंती महोत्सवाचे. या मंगलमयी प्रसंगी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने संपूर्ण पनवेल शहर साईंच्या जयघोषाने दुमदुमून गेले होते.

या सोहळ्याचे औचित्य साधून आयोजित केलेल्या शोभायात्रेमध्ये पनवेलचे महापौर नितीन पाटील, शिर्डी साई संस्थानचे उपजिल्हाधिकारी भीमराज दराडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, रामलाल चौधरी, राम थदानी, डॉ. शकुंतला माखिजा यांच्यासह अनेक नगरसेवक, राजकीय पदाधिकारी आणि साईभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही भव्य शोभायात्रा रेल्वे स्टेशन मार्गे तक्का, पंचरतन सर्कल, टपाल नाका, भाजी मार्केट, ऐतिहासिक विरुपाक्ष मंदिर आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे कोहिनूर नाका येथे पोहोचली. मार्गावर ठिकठिकाणी भक्तांनी पादुकांचे दर्शन घेण्यासाठी आणि स्वागत करण्यासाठी गर्दी केली होती. १८ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत या दिव्य पादुका मश्री साई नारायण बाबा आश्रमम पनवेल येथे दर्शनासाठी विराजमान राहणार आहेत.

गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत भक्तांना अखंड दर्शन घेता येणार असून यावेळी भजन आणि महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत दर्शन सुरू राहील आणि त्यानंतर या पादुका पुन्हा शिर्डीकडे प्रस्थान करतील. या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी पनवेल व परिसरातील साईभक्तांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे.

## स्वनाथ फाउंडेशनचा प्रत्येक मुलाला कुटुंब उपक्रम

**मुंबई :** कुटुंब ही भारतीय संस्कृतीतील महत्त्वाची संकल्पना असून मुलांना कुटुंबातून मिळणारे संस्कार त्यांच्या भवितव्याला दिशा देतात. प्रत्येक मुलाला कुटुंब मिळावे या ध्येयाने कार्यरत असलेल्या स्वनाथ फाउंडेशनतर्फे प्रतिपालकत्व या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सन २०१६पासून देशव्यापी स्तरावर कार्यरत असलेल्या स्वनाथ फाउंडेशनचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला होता. फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. श्रेया भारती यांनी 'पोस्टर केअर' व 'प्रतिपालकत्व' या विषयांवर सातत्याने जनजागृती केली आहे. ६ ते १८ वयोगटातील मुलांना कुटुंबाचे वातावरण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मूल दत्तक घेण्याची इच्छा असलेल्या दाम्पत्यांना थेट अनाथालयाशी संपर्क साधावा लागतो, मात्र प्रतिपालकत्व ही संकल्पना अधिक व्यापक स्तरावर पोहचवून प्रत्येक मुलाला कुटुंबाचे प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी मिळावी, हा या उपक्रमामागील हेतू आहे. या उद्दिष्टासाठी देशातील पहिली राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक अनाथ नाही स्वनाथ! मुलांना कुटुंब मिळवून देणे हे स्वनाथ फाउंडेशनचे ध्येय असून मुलांचे बालपण सुखी, समृद्ध आणि प्रेमळ वातावरणात जावे, यासाठी संस्था कार्यरत आहे. समाजामध्ये कुटुंबाधारित सेवांना प्रोत्साहन देत प्रतिपालक सेवेला मान्यता व स्थान मिळावे, यासाठी फाउंडेशन प्रयत्नशील आहे.

## ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना व्होकेशनल एक्सलन्स ॲवॉर्ड



**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनतर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात गेली २५ वर्षे सातत्याने विविध वृत्तपत्रात पत्रकारिता करणारे त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांच्या कामाची व कार्याची दखल घेत त्यांना व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड देवून गौरविण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचे अध्यक्ष रो. निलेश पोटे, सचिव रो.हितेश राजपूत, खजिनदार जितेंद्र बालड, डायरेक्टर रो. विजय मेढेकर, संजय जैन, डॉ. जयश्री पाटील, देवयानी पोटे यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन पनवेल येथील स्व. पावर्तीबाई महादेव सावळेकर रोटरी सभागृह येथे हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या वेळी सौ. मेघना संजय कदम यांनी प्राणिक हेलींग आणि मेडीटेशन या संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमांतर्गत अध्यक्ष निलेश पोटे यांनी आगामी रोटरी क्लब तर्फे घेण्यात येणाऱ्या विविध प्रोजेक्ट संदर्भात त्यामध्ये प्रामुख्याने माहिती दिली.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये शिवशाही अवतरली!

कार्यक्रमाच्या शेवटी मिरवणुकीतील विजेत्या चित्ररथांना आणि लेझीम पथकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यातील चित्ररथ स्पर्धेत महापालिका शिक्षण विभागाने प्रथम, तर लेझीम स्पर्धेत आगरी शिक्षण संस्था आणि महापालिका शाळा क्रमांक ६ यांनी आपापल्या गटात अव्वल स्थान पटकावले. उत्कृष्ट वेशभूषेचा मान इंदुबाई वाजेकर स्कूलने मिळवला.

या सोहळ्यास नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयवंत पगडे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, सुनील बहिरा, मुकीत काझी, संदीप पाटील, सतीश पाटील, शशिकांत शेळके, प्रांत अधिकारी पवन चांडक, संजय भगत, इक्बाल काझी यांच्यासह पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

## शिवरायांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारण्यासाठी भूखंड न दिल्यास सिडको आणि आमदारांच्या घरावर मोर्चा



ज.आ. भगतसाहेबांनी १९८१मध्ये शिवरायांचा पुतळा कोपर फाट्यावर उभारला आहे. आता आपल्याला शिवरायांचा अश्वारूढ पुतळा अटल सेतूजवळच उभारायचा आहे, कारण रयतेचे राजे एकच म्हणजे शिवाजी महाराज. महिलांचा सन्मान करणारे एकमेवाद्वितीय शिवाजी महाराज. त्यांच्यामुळेच आपण आज सन्मानाने जगतोय. म्हणून शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारणे ही आपली अस्मिता आहे. सिडकोच्या एमडींना तीन वेळा येथे आणले. आपला इतिहास हा आंदोलनांचा आहे. जर एक रुपया दराने भूखंड मिळाला नाही, तर सिडकोच्या अधिकाऱ्यांविरोधात तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर एकदा ठरवतात ते कार्य पूर्ण केल्याशिवाय थांबत नाहीत. त्यामुळे या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, असेही ठामपणे अधोरेखित केले.

सकाळी गव्हाणहून वाद्यगजर, भगवे ध्वज आणि शिवरायांचे जयघोष करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक उलवे नोडमधील खारकोपर रेल्वेस्थानकाजवळील रामशेठ ठाकूर मैदानात पोहोचली, जिथे संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते.

मुख्य जयंती सोहळ्यात शिवप्रतिमेचे पूजन, माल्यार्पण आणि अभिवादन लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, समितीचे अध्यक्ष वसंत पाटील, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, जयवंत देशमुख, रविशेठ पाटील, विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, अनंता ठाकूर, अशोक कडू, गजानन घरत, चिंतामणी घरत, भार्गव ठाकूर, साईचरण म्हात्रे, योगिता भगत, मीनाक्षी पाटील, ज्योत्स्ना ठाकूर, किशोर पाटील यांच्यासह उपस्थित शिवप्रेमींनी केले. मान्यवरांनी युवकांना आवाहन केले की, शिवचरित्राचा गौरव करत शिवरायांचे विचार आणि आदर्श जीवनात आत्मसात करावे आणि समाजाच्या कल्याणासाठी पुढाकार घ्यावा.

या उत्सवात परिसरातील ग्रामस्थांनी आणि विविध सामाजिक संस्थांनी सक्रिय सहकार्य दिले, ज्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन जयंती समितीने उत्कृष्टरित्या केले. उलवे नोडमधील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव हा स्थानिक समाजासाठी प्रेरणादायी आणि ऐतिहासिक संस्कृती जपण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे. या उत्सवासाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती तसेच गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावाखाडी, उलवे, वहाळ, मोरावे, बामणडोंगरी, जावळे व उलवे नोड येथील ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## माणगाव येथे शिवजयंती उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुका सकल मराठा समाजातर्फे गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी क्षत्रिय मराठा भवन माणगाव याठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या जयंतीनिमित्त ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना इतिहासाची माहिती देण्यात आली. शिवजयंतीच्या पावन पर्वानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य,पराक्रम व अद्वितीय युद्ध कौशल्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहचविण्याचा उद्देशाने सकल मराठा समाज माणगाव तालुका यांच्यावतीने ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शन क्षत्रिय मराठा भवन माणगाव याठिकाणी भरविण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवरायांची यशोगाथा सांगितली.

# उरण शहराच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध

## उपनगराध्यक्ष रवी भोईर यांची ग्वाही

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या विषय समित्यांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने सर्व समित्यांच्या सभापती पदावर विजय संपादन केले. त्यामुळे उरण नगर परिषदेत भाजपचेच बहुमत असल्याचे सिद्ध झाले असून शहराच्या विकासाठी आम्ही कटिबद्ध असल्याची ग्वाही उपनगराध्यक्ष रवी भोईर यांनी दिली.



उरण नगर परिषदेत नगराध्यक्ष जरी विरोधी पक्षाचा असला तरी जनतेने आमचे नगरसेवक बहुमताने निवडून देऊन भाजपवर विश्वास दाखविला आहे. त्यामुळे उरण शहरातील जनतेचे प्रश्न सोडविणे ही आमची बांधिलकी असल्याचे उपनगराध्यक्ष रवी भाईर यांनी नमूद केले.

उरण शहरातील नागरिकांना एम आयडीसीकडून पाणीपुरवठा करण्यात येतो, मात्र वीस वर्षांपूर्वीपासून नगर पालिकेची पाणीपट्टी थकीत आहे. सध्या नगरपालिका नियमित पाणीपट्टी भरत आहे. तरीही त्या थकीत पाणीपट्टीचा प्रश्न तसाच असला तरी हा प्रश्न सोडविण्यासाठी पहिले प्राधान्य देण्याचा निर्धार उपनगराध्यक्ष रवी भोईर यांनी व्यक्त केला.

उरण शहरातील जी विकासकामे बाकी आहेत, ती पूर्ण करण्यासही आम्ही प्राधान्य देणार आहोत. त्यात टाऊन हॉल असो, बायपास रस्ता असो, अर्धवट झालेले रस्ते अशी विकासकामे लवकरात लवकर पूर्ण करणार असून शहरात महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृहे उभारण्यासाठी जागा बघून प्राधान्य देणार असल्याचे माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांनी सांगितले.

उरणचे आमदार महेश बालदी यांनी उरण शहराच्या विकासाठी करोडो रुपयांचा निधी राज्य, केंद्र शासनाकडून आणल्याने आज नगर परिषदेची भव्य इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजगृह, फुल मार्केट, उरण मोरा कॉंक्रीट रस्ता अशी अनेक विकासकामे झाली असल्याचे भाजप उरण शहराध्यक्ष कौशिक शहा यांनी आवर्जून सांगितले.

गेल्या पाच वर्षातील अडीच वर्षे कोरोनामध्ये गेल्याने आम्हाला फक्त अडीच वर्षेच काम करायला मिळाली, म्हणून उरण शहरातील काही समस्या राहिल्या आहेत. त्या मार्गी लावूच असे सांगून शहरातील कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असे उपनगराध्यक्ष भोईर यांनी सांगितले. त्याचप्रमाणे वीर सावरकर मैदान हे फक्त खेळाचे मैदान असल्याने त्याचेही सुशोभीकरण करण्याचे सूतोवाच भाजप शहराध्यक्ष कौशिक शाह यांनी केले.

# कर्मभूमी आणि धर्मभूमीसाठी जगा -लोकनेते रामशेठ ठाकूर

## कुंडेवहाळ शाळेच्या नूतन इमारतीचे उद्‌घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या कर्मभूमीला आणि धर्मभूमीला देव मानून आपण जगले पाहिजे, तरच आयुष्यात मोठे होता येते, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथे रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या नूतन इमारतीचा उद्‌घाटन सोहळ्यावेळी केले तसेच शाळेच्या सुंदर आणि सुसज्ज इमारतीबद्दल समाधान व्यक्त केले.

कुंडेवहाळच्या ग्रामस्थांनी घेतलेली अपार मेहनत आणि विद्यार्थ्यांना आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दाखवलेली जिद्द कौतुकास्पद असल्याचे सांगत त्यांनी ग्रामस्थांचे आभार मानले. या विद्यालयातून दर्जेदार शिक्षण घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी भविष्यात उज्ज्वल यश संपादन करतील आणि गावाचा नावलौकिक करतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त केला.

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथे रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बांधण्यात आली आहे. या इमारतीचा उद्‌घाटन सोहळा बुधवारी (दि. १८) मोठ्या उत्साहात झाला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या शाळेच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समिती सदस्य रंजना वास्कर, सदाशिव वास्कर, प्रकाश जितेकर, माजी जि.प.सदस्य रवींद्र पाटील, महेश भोईर, अनिल खारकर, विनोद भोईर, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, शाहू सतपाल, मठकर, जगताप, रेवण पाटील, रामचंद्र वास्कर, कपिल पाटील, अनिल वास्कर, निलेश पाटील, ऋषिकेश वास्कर, अरविंद वास्कर, तुकाराम वास्कर, रमण वास्कर, ज्ञानेश्वर वास्कर, प्रल्हाद वास्कर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि मान्यवर उपस्थित होते.

नूतन शाळेच्या इमारतीमुळे गावातील शैक्षणिक वातावरणात नवी भर पडली असून सर्व स्तरांतून या उपक्रमाचे स्वागत होत आहे. दरम्यान, यावेळी पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीत करंजाडे गणातून भाजपच्या रंजना सदाशिव वास्कर या विजयी झाल्याबद्दल त्यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला.





# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यासाठी त्यांचा पाया मजबूत करण्याचे मोलाचे काम रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमधून अत्यंत प्रभावीपणे होत आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे येथे अध्यक्षस्थानावरून काढले. उलवे नोडमधील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा बुधवारी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये बुधवारी (दि. १८) झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण अधिकारी शाहू सतपाल यांची विशेष उपस्थिती होती. या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, स्कूलचे चेरमन परेश ठाकूर, शकुंतला ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, मुख्याध्यापक किरणकुमार सुथार, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, ॲड. राहुल घरत, स्कूल कमिटी सदस्य कविता खारकर, राजेश खारकर, धीरज ओवळेकर, माजी मुख्याध्यापिका साधना डोईफोडे, स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, स्कूल को-ओर्डीनेटर हर्षल फडके, मनीषा मोरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यंदाच्या स्नेहसंमेलनाची संकल्पना 'यशोगाथा' अशी ठेवण्यात आली होती. या माध्यमातून भारतातील विविध राज्यांमधील महान योद्ध्यांचा इतिहास लघुपटाद्वारे मांडून त्यावर आधारित आकर्षक नृत्याविष्कार सादर करण्यात आले. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२५-२६मधील गुणवंत विद्यार्थी आणि शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक प्रगती, क्रीडा, विज्ञान प्रदर्शन आणि विविध स्तरांवरील यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेली एक भावस्पर्शी लघुचित्रफीत यावेळी दाखवण्यात आली, ज्यानंतर त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेच्या प्रगतीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, तर परेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कशा प्रकारे कटिबद्ध आहे याची माहिती दिली. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बहारदार सादरीकरणानंतर या सोहळ्याची सांगता झाली.

## ट्रकची कारला धडक, दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

ट्रकने कारला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ट्रक क्रमांक जी जे ३२ व्ही २०२३ वरील चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ओमकार जगदीश घरत हे कोनगाव येथे राहत असून ते शुभम सुरेश घरत यांच्यासोबत कोन गाव येथून कासारभट, पनवेल येथे इनोवा क्रिस्टा कार क्रमांक एम एच ४६ बीव्ही ७६ ७५ घेऊन जात होते. चिंचवण पनवेल येथे चर्चच्या समोर आले असता समोरून आलेला ट्रक हा विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने आला आणि त्यांच्या इनोवा कारला जोरात ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये कारची एअर बॅग निघाल्याने ओमकार घरत त्याला किरकोळ दुखापती झाल्या. त्यांच्यासोबत असलेले शुभम सुरेश घरत हा गंभीर जखमी झाला. शुभम घरत यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

# शिवरायांच्या स्मृतींना उजाळा देणे काळाची गरज -परेश ठाकूर



## मराठा वेशभूषा स्पर्धा उत्साहात; विजेत्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजचा दिवस हा तमाम मराठी माणसासाठी अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचे आराध्य दैवत असून त्यांच्या पराक्रमाच्या स्मृतींना उजाळा देणे ही काळाची गरज आहे. नवीन पिढीला आपला देदीप्यमान इतिहास कळावा याच उद्देशाने या वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गावदेवी पाडा येथे आयोजित वेशभूषा स्पर्धेदरम्यान केले.

भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक १९ आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या विशेष पुढाकाराने गुरुवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराज जयंती शोभायात्रेनिमित्त मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेलमधील गावदेवीपाडा येथे झालेल्या या सोहळ्याचे यंदाचे पाचवे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे यंदाही चिमुकल्यांचा मोठा प्रतिसाद या स्पर्धेला लाभला. शिवरायांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी आणि लहान मुलांमध्ये शौर्याची भावना निर्माण करण्यासाठी या उपक्रमाचे सातत्य टिकवून ठेवण्यात आले आहे.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी स्पर्धेस भेट देत शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मावळ्यांची जिगरबाज रूपे, जिजाऊ माता आणि शिवकालीन मावळ्यांची वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. केवळ वेशभूषेवर न थांबता अनेक स्पर्धकांनी शिवरायांच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंगांवर अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली, तर काहींनी आपल्या पहाडी आवाजात पोवाडे गाऊन संपूर्ण वातावरण शिवमय करून टाकले. लहान मुलांच्या या कलागुणांमुळे उपस्थित पालकांनी आणि शिवप्रेमींनी त्यांचे भरभरून कौतुक केले. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास सहाय्यक पोलीस उपायुक्त भाऊसाहेब ढोले, नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेविका दर्शन भोईर, प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, ॲड. शिवानी घरत, डॉ. अस्मिता घरत यांच्यासह पवन सोनी, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, देवांशु प्रभाळे, रोहित जगताप आदी उपस्थित होते.

**(अधिक छायाचित्रे पान ६ वर)**

**पनवेल : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६वी जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि हर्षोल्हासाने साजरी करण्यात आली. यानिमित्ताने भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी परिसरातील शिवजयंती उत्सवांना भेटी देऊन शिवरायांना अभिवादन केले. त्यांच्या समवेत पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवप्रेमी उपस्थित होते. आयोजकांकडून भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.**













**खांदा कॉलनी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६वी जयंती पनवेल परिसरात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. खांदा कॉलनी येथे ओम साई खांदेश्वर महिला मंडळ आणि बाल मित्र मंडळाच्या वतीने भव्य शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी यांनी भेट देऊन छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या सोहळ्यास माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेविका सीताताई पाटील, नगरसेवक सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, भाजप नेते भीमराव पवार, मोतीराम कोळी, सदानंद पाटील, सचिन पाटील, मिथुन दर्गे यांच्यासह पदाधिकारी आणि शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## संपादकीय

# प्रतिमा उज्ज्वलच

तांत्रिक चर्चांचे तपशील खळबळजनक नसतात. त्यामुळे काही वेळा त्या दुर्लक्षित राहून त्याऐवजी एखाद्याच वादग्रस्त बाबीला समाजमाध्यमांमध्ये अनाठायी प्रसिद्धी मिळून जाते. तसेच काहिसे राजधानी नवी दिल्लीतील 'एआय इम्पॅक्ट समिट'च्या बाबतीत घडताना दिसले खरे, परंतु भारताच्या 'एआय समिट'चा जगभरात अनेक सकारात्मक गोष्टींसाठी बोलबाला असून या क्षेत्रातील भारताच्या उज्ज्वल प्रतिमेमुळेच वीस देशांचे राष्ट्रप्रमुख तसेच एआय क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचे सीईओ या समिटमध्ये गुरुवारी सहभागी झालेले दिसले.

**ग्लोबल साऊथ म्हणजेच विकसनशील देशांमध्ये एआयची उपलब्धता आजच्या घडीला विकसित देशांपेक्षा निम्मी आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी दशकाच्या अखेरीस ५० अब्ज डॉलरची गुंतवणूक मार्गावर आहे अशी घोषणा तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीचे नाव असलेल्या मायक्रोसॉफ्ट कंपनीकडून नवी दिल्लीतील 'एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये करण्यात आली. या शिखर परिषदेचे गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी २० देशांचे राष्ट्रप्रमुख तसेच एआय क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचे सीईओ उपस्थित होते. समिटमधील प्रदर्शनात सहभागी झालेल्या गलगोटियास विद्यापीठाची प्रतिनिधीच्या चुकीच्या विधानामुळे बुधवारी मोठी फजिती झाली. चीनमध्ये बनवण्यात आलेला रोबोटिक कुत्रा प्रदर्शनाच्या स्टॉलमध्ये ठेवून विद्यापीठाच्या प्रतिनिधीने टीव्ही कॅमेऱ्यासमोर तो आपल्या विद्यापीठाने विकसित केल्याचे सांगितल्यामुळे समाजमाध्यमांवर या विद्यापीठाची प्रचंड खिल्ली उडवण्यात आली. खोटारडेपणाबद्दल सगळीकडून टीकेची झोड उठल्यावर या विद्यापीठाने जाहीर माफी मागितली तसेच आपल्या प्रतिनिधीने माहिती न घेता अतिउत्साहात चुकीचे विधान केल्याचा खुलासाही केला. या प्रकारानंतर सरकारने कठोर पावले उचलत गलगोटियास विद्यापीठाला स्टॉल तातडीने रिकामा करण्याचे आदेश दिले. चर्चेत आलेला हा प्रकार निंदनीय आहेच, परंतु एका विद्यापीठाच्या कुणा प्रतिनिधीच्या चुकीच्या विधानामुळे देशाच्या आयटी क्षेत्रातील प्रतिमेला धक्का लागावा एवढी आपली या क्षेत्रातील प्रतिमा लेचीपेची नाही. गेल्या काही वर्षांत अनेक भारतीयांनी आयटी क्षेत्रात भरीव योगदान दिलेले असल्यामुळे भारत या क्षेत्रात घट्ट पाय रोवून उभा आहे. त्यामुळेच भारताच्या राजधानीत आयोजित या 'एआय समिट'चा जगभरात अनेक सकारात्मक गोष्टींसाठी बोलबाला आहे. पंतप्रधान मोदी यांच्यासह फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन तसेच गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांच्यासारख्या आयटी क्षेत्रातील दिग्गजांनी गुरुवारी या शिखर परिषदेला संबोधित केले. वीसहून अधिक देशांचे प्रमुख आणि ५००हून अधिक जागतिक एआय नेते या शिखर परिषदेत सहभागी झाले आहेत. पूर्वतयारीच्या बाबतीत काही उणीवा राहिल्याचे पहिल्या दिवशी दिसून आले. परंतु केंद्र सरकारच्या प्रतिनिधींनी तातडीने सर्व तक्रारींची दखल घेण्याची व त्यानुसार बदल करण्याची तयारी दर्शवली. आपल्याकडील अफाट लोकसंख्येमुळे बरेचदा सर्वसामान्य जनतेकडून अपेक्षित प्रतिसादाचे आयोजकांचे अंदाज चुकतात. शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी नेमके तेच घडले. सर्वसामान्यांनी परिषदेला केलेली गर्दी आयोजकांच्या कल्पनेपलीकडची होती. त्यामुळे तेथील सर्व व्यवस्थेवर ताण आला. अर्थात याचे समर्थन होऊ शकत नाही, परंतु लगेच दुसऱ्या दिवसापासून सुयोग्य खबरदारी घेऊन व्यवस्थेत आवश्यक ते बदल करण्यात आल्याचे तिथे भेट देणाऱ्या अनेकांनी आवर्जून नमूद केलेले दिसले. तेथील प्रदर्शनात मांडलेल्या नवोन्मेषाच्या अनेक आविष्कारांचेही या क्षेत्रातील तज्ज्ञांनी कौतुक केले आहे. भारताकडे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मोठे टॅलेंट आहे. त्यामुळेच या ऐतिहासिक एआय समिटमध्ये या क्षेत्रातील असंख्य मान्यवर सहभागी झाले आहेत व जगाचे या परिषदेकडे लक्ष आहे.**

# हिंद-दी-चादर सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारा कार्यक्रम

हिंद-दी-चादर हा महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेला एक विशेष कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत श्री गुरू तेग बहादूर साहिब यांच्या जीवन, विचार आणि बलिदान यांचे स्मरण करून जनतेमध्ये धर्मस्वातंत्र्य, सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय एकता यांचा संदेश देण्यात येतो.

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील विविध विभागीय मुख्यालये, जिल्हे आणि महानगरांमध्ये कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, वाशीम, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), लातूर, धाराशिव, बीड, अहमदनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगाव या ठिकाणी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिब यांची शहादत १६७५ मध्ये झाली. त्यांनी धर्म आणि मानवतेच्या रक्षणासाठी महान बलिदान दिले. त्यांच्या शिकवणुकीत समानता, सहिष्णुता, निर्भयता आणि मानवाधिकार यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या जीवनकार्यामुळे समाजाला योग्य दिशा मिळाली आहे.

हिंद-दी-चादर हा कार्यक्रम धर्मस्वातंत्र्य, सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांच्या जीवनकार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे, त्यांच्या शिकवणीचा प्रचार करणे आणि समाजात सद्भावना निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे.

सध्याच्या काळात महाराष्ट्र शासन शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांत गुरु तेग बहादूर साहिब यांच्या जीवन, विचार आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना त्याग, धैर्य आणि मानवतेची मूल्ये समजतील आणि




राष्ट्रीय एकतेची भावना वाढीस लागेल.

या उपक्रमाच्या माध्यमातून हिंद-दी-चादर कार्यक्रम सर्व धर्म, पंथ, समाज आणि वर्गातील लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतो. समाजात शांती, बंधुता आणि समता वाढविणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

एकता आणि सद्भावना वाढवणे

या समारंभाच्या माध्यमातून भावी पिढ्यांना शांती, एकता आणि सामुदायिक सद्भावनेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही आदर्श मूल्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी ठामपणे समर्पित केली होती तसेच समाजात परस्पर सन्मान, सहिष्णुता आणि सह-अस्तित्वाची संस्कृती प्रोत्साहित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**लंगर सेवा**

लंगर अथवा सामुदायिक स्वयंपाकघराच्या माध्यमातून निःस्वार्थ सेवेची परंपरा साकार केली जाईल. यामध्ये कोणताही भेदभाव न करता गरजू आणि कार्यक्रमात उपस्थित असलेल्या भाविकांना प्रसादरूप भोजन दिले जाईल. ही सेवा सर्वांचा सन्मान, सर्वांची सेवा या तत्त्वाचे प्रतीक आहे आणि सामाजिक समता, करुणा व सामूहिक सहभागितेच्या मूल्यांना बळकटी देते. ही संपूर्ण सेवा समुदायातील समर्पित स्वयंसेवकांच्या सहकार्याने आणि सेवा-भावनेने पार पाडली जाईल.

गुरु तेग बहादूर यांचे जीवन आणि कार्य

गुरु तेग बहादूर साहिब हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांनी मानवतेच्या सेवेसाठी आणि धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यांनी सर्व मानवांना समान मानण्याचा आणि सर्व धर्मांचा सन्मान करण्याचा संदेश दिला.

**धर्म आणि मानवतेचे संरक्षण**

गुरु तेग बहादूर यांनी अन्याय, अत्याचार आणि जबरदस्ती धर्मांतराच्या विरोधात निर्भयपणे आवाज उठवला. त्यांनी सांगितले की धर्म हा व्यक्तीच्या अंतःकरणाचा विषय आहे आणि कोणालाही जबरदस्तीने धर्म बदलायला लावू नये. त्यांच्या या भूमिकेमुळे त्यांना मोठा विरोध सहन करावा लागला.

समता, बंधूता आणि सहिष्णुता

गुरुजींच्या शिकवणुकीत समता, बंधुता आणि सहिष्णुता यांना फार महत्त्व होते. त्यांनी समाजातील जात-पात, उच्च-नीच भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न केला आणि सर्व मानव एकसमान असल्याचा संदेश दिला.

**शिक्षण आणि समाजसेवा**

गुरु तेग बहादूर यांनी समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी गुरुद्वारे, लंगर आणि धर्मशाळांच्या माध्यमातून गरीब आणि गरजू लोकांची सेवा केली. समाजात नैतिक मूल्ये रुजवणे हे त्यांच्या कार्याचे मुख्य उद्दिष्ट होते.

**त्याग आणि शहादत**

हिंदूच्या गुरु तेग बहादूर यांनी त्यांच्या संरक्षणासाठी पुढाकार घेतला. त्यांनी धर्मस्वातंत्र्याचा त्याग न करता दिल्लीमध्ये आपले प्राण अर्पण केले. त्यामुळे त्यांना हिंद की चादर म्हणजेच हिंदू धर्माचे रक्षण करणारे म्हणून ओळखले जाते.

**आजच्या समाजासाठी संदेश**

गुरु तेग बहादूर यांचे जीवन आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी शिकवले की सत्य, धैर्य, करुणा आणि मानवता हेच खरे धर्माचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या विचारांमुळे समाजात शांतता, बंधुता आणि राष्ट्रीय एकता वाढीस लागते.

**शीख वारशाचा सन्मान**

महाराष्ट्र शासनाने श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहादत वर्षानिमित्त, त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी दिलेल्या त्यांच्या महान बलिदानाच्या स्मरणार्थ हा धार्मिक कार्यक्रम आयोजित करून त्यांना आदरांजली अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**युवकांना शिक्षित आणि प्रेरित करणे**

या आयोजनाचा मुख्य उद्देश युवक पिढीला श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या उपदेश, त्याग आणि जीवन-दर्शनाबद्दल जागरूक करणे, तसेच त्यांच्या जीवन, शिकवणी आणि धार्मिक स्वातंत्र्य व मानवी मूल्यांच्या संरक्षणासाठी दिलेल्या योगदानाची माहिती देणे हा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शीख इतिहास आणि वीरतेला राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे सादर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर या समारंभाचे महत्त्व**

राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर भव्य व सुव्यवस्थित आयोजनाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहादतीचे राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करणे, त्यांचा त्याग, धैर्य आणि मानवी मूल्यांचा संदेश देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या माध्यमातून धार्मिक स्वातंत्र्य, अंतःकरणाची स्वातंत्र्य आणि सामाजिक समरसता यांसारख्या मूलभूत मूल्यांबद्दल जनजागृती केली जाईल तसेच राष्ट्रीय एकता आणि सांस्कृतिक चेतनेला बळ मिळेल.

'विरासत-ए-सीखी' नावाची प्रदर्शनी

कारागिरी, आध्यात्मिक समुदाय आणि इतिहासकारांना एकत्र मंच उपलब्ध करून देणे, जेणेकरून ते आपले संशोधन, सर्जनशीलता आणि सादरीकरणाद्वारे वीरता, त्याग आणि मानवी मूल्यांशी संबंधित कथा जिवंत स्वरूपात मांडू शकतील, हा या प्रदर्शनीचा उद्देश आहे.

या प्रदर्शनीच्या माध्यमातून युवक आणि वर्तमान पिढीला ऐतिहासिक चेतना, सांस्कृतिक वारसा आणि नैतिक मूल्यांशी जोडून त्यांना प्रेरित करणे हे लक्ष्य आहे. यामध्ये शीख धर्माचा समृद्ध इतिहास, संस्कृती, सर्व शीख गुरूंची माहिती तसेच शीख धर्माशी संबंधित इतर समुदायांशी असलेल्या संबंधांबद्दलही सविस्तर माहिती दिली जाईल.


**-मनोज सानप,**
**उपसंचालक (माहिती)(अ.का.),**
**कोकण विभाग, नवी मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल सर्चवरचा 'तो' नंबर तुम्हाला करू शकतो कंगाल

इंटरनेटवर कोणतीही गोष्ट शोधायची असेल तर आपण डोळे झाकून गुगलचा आधार घेतो. युझर्सचा अनुभव अधिक सुलभ करण्यासाठी गुगलने २०२४मध्ये 'AI Overviews' हे नवीन फिचर आणले. लांबलचक वेबसाइट्सच्या यादीऐवजी एआयने दिलेला संक्षिप्त सारांश वाचणे अनेकांना सोपे वाटते, मात्र हेच स्मार्ट फिचर आता तुमच्यासाठी डोकेदुखी ठरू शकते. सायबर गुन्हेगारांनी आता या फिचरचा वापर करून सर्वसामान्य लोकांची बँक खाती रिकामी करण्याचा नवा सापळा रचला आहे.



गुगलच्या 'AI Overviews'मध्ये अनेकदा वेगवेगळ्या वेबसाइट्सवरून माहिती गोळा करून एक सारांश दिला जातो. सायबर भामटे काय करत आहेत? ते छोट्या किंवा बनावट वेबसाइट्सवर मोठ्या कंपन्यांचे बनावट कस्टमर केअर नंबर टाकत आहेत. जेव्हा तुम्ही गुगलवर एखाद्या बँकेचा किंवा ई-कॉमर्स कंपनीचा हेल्पलाइन नंबर शोधता, तेव्हा हे एआय फिचर त्या बनावट वेबसाइटवरून चुकीचा नंबर उचलते आणि तुम्हाला अधिकृत माहिती म्हणून दाखवते.

एका कॉलवर बँक खाते रिकामे!

लोक एआयने दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवतात आणि त्या नंबरवर कॉल करतात. समोर बसलेला ठग कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून तुमच्याकडून बँक डिटेल्स, ओटीपी किंवा एखादे ॲप डाउनलोड करण्यास सांगतो. तुम्ही ही माहिती दिली की क्षणात तुमचे बँक खाते साफ केले जाते. याला तांत्रिक भाषेत 'AI Hallucinations' म्हणतात, जिथे एआय सिस्टम चुकीची माहिती खरी म्हणून सादर करते.

तुलना करण्याची संधी हुकली!

याआधी जेव्हा आपण गुगलवर काही शोधायचो, तेव्हा अनेक वेबसाइट्सच्या लिंक दिसायच्या. त्यामुळे युझरला दोन-तीन ठिकाणी तपासून पाहण्याची संधी मिळायची, मात्र आता एआय थेट निष्कर्ष किंवा उत्तर समोर ठेवते. युझर्सना वाटते की गुगलने दिलेले उत्तर हे अंतिम आणि सत्यच असणार. नेमका याच मानसिकतेचा फायदा सायबर गुन्हेगार घेत आहेत.

गुगलने या फिचरमध्ये अतिरिक्त सुरक्षा उपाय जोडल्याचा दावा केला असला तरी सायबर भामटे सातत्याने नवनवीन पळवाटा शोधत आहेत. त्यामुळे 'डिजिटल इंडिया'मध्ये वावरताना तुमची सतर्कताच तुमचा पैसा वाचवू शकते.

# नाटककार, समीक्षक के. नारायण काळे

मराठीतील एक कवी, नाटककार, समीक्षक, चित्रपट निर्माते आणि नियतकालिकांचे संपादक केशव नारायण काळे यांचा आज स्मृतिदिन. ते बीएएलएलबी होते आणि त्यांचे इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. ग्रीक आणि युरोपियन रंगभूमीचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. नाटकाच्या आवडीमुळेच ते नाटककार झाले. त्यांना के.नारायण काळे म्हणून ओळखले जात असे.



## निमित्त

महाराष्ट्राच्या भूमीने अनेक नररत्न देशाला दिली, ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने योगदान दिले. विविध मान्यवरांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. त्यापैकीच एक के.नारायण काळे. त्यांचा जन्म २४ एप्रिल १९०४ रोजी झाला.

सुरुवातीच्या काळात काळे यांनी 'भावशर्मा' या नावाने कविता आणि कथा लिहिल्या. १९३२ साली त्यांचा 'सहकारमंजिरी' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यांनी 'अभिजात' ही चित्रपट कंपनी स्थापन केली आणि 'म्युनिसिपालिटी' या चित्रपटाची निर्मिती केली. प्रभात चित्रसंस्थेवर एक लघुपट काढला होता.

के.नारायण काळे यांनी आठ चित्रपटांत कामे केली होती. नाट्यकलेच्या आकर्षणातून त्यांनी १९३३मध्ये नाट्यमन्वंतर ही नाट्यसंस्था काढली. त्यांनी 'मुद्रा राक्षसम' या संस्कृत नाटकाचे 'कौटिल्य' या नावाचे भाषांतर करून ते त्या संस्थेतर्फे रंगमंचावर आणले. त्यागराज कैलासम यांचे दि पर्पज हे नाटक त्यांनी 'प्रयोजन' या नावाने रंगभूमीवर आणले.

नाट्यमन्वंतर या संस्थेने 'आंधळ्यांची शाळा' हे नाटक रंगमंचावर सादर केले. परंपरेने आलेले संगीत पौराणिक-ऐतिहासिक नाटक नाकारून के. नारायण काळे, अनंत काणेकर, पार्श्वनाथ आळतेकर, ग.य. चिटणीस आदी नाट्यविचारवंतांनी एकत्र येऊन 'आंधळ्यांची शाळा'ची निर्मिती केली. यासाठी के. नारायण काळे यांना त्यांचा परदेशी रंगभूमीचा व्यासंग कामी आला.

१ जुलै १९३३ रोजी झालेल्या या नाटकाच्या पहिल्याच प्रयोगात केशवराव दाते, नाटककार वर्तकांच्या पत्नी सौ. पद्मावती वर्तक, म.रा. रानडे, पार्श्वनाथ आळतेकर, पितळे, ल.भ. केळकर, माधवराव प्रभू, नामजोशी, हर्डीकर आणि के. नारायण काळे यांच्या भूमिका होत्या. नाटकाच्या नायिका अठरा वर्षे वयाच्या ज्योत्स्ना भोळे होत्या. या नाटकाचे त्या काळात शंभराच्या आसपास प्रयोग झाले होते.

के.नारायण काळे हे कलातत्त्वचिंतक, साहित्यसमीक्षक व पुरोगामी विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. रत्नाकर, प्रतिभा, मराठी साहित्य पत्रिका, अशा नियतकालिकांचे त्यांनी संपादनही केले होते.

अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे २० फेब्रुवारी १९७४ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने एक कवी, नाटककार, समीक्षक, चित्रपट निर्माता आणि संपादक काळाच्या पडद्याआड गेला. स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# प्लास्टिकच्या कपात चहा प्यायल्याने होऊ शकतात आजार

ऑफिसमध्ये कामाच्या गडबडीत बाहेरच्या टपरीवरून आलेला गरमा-गरम चहा, जो पॉलिथीनच्या पिशवीत किंवा पातळ प्लास्टिकच्या कपात थेट तुमच्या टेबलावर येतो तो पिण्याची सवय तुम्हाला सुखावह वाटत असली तरी आरोग्यासाठी ती धोक्याची घंटा ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, जेव्हा गरम चहा निकृष्ट दर्जाच्या प्लास्टिकमध्ये किंवा पॉलिथीनमध्ये टाकला जातो, तेव्हा त्यातील घातक केमिकल चहात विरघळू शकतात.



अमृता हॉस्पिटलचे इंटरनल मेडिसिन आणि एंडोक्राइनोलॉजी तज्ज्ञ डॉ. मोहित शर्मा यांच्या मते, ६० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान असल्यास फ्थॅलेट्स, बिस्फेनॉल ए आणि स्टायरीनसारखे हानिकारक घटक चहात मिसळू शकतात. हे पदार्थ शरीरातील हार्मोन यंत्रणेवर परिणाम करतात आणि दीर्घकाळात गंभीर आजारांची शक्यता वाढवू शकतात.

डॉक्टरांनी सांगितलं की, हे केमिकल 'एंडोक्राइन डिसरप्टर्स' म्हणून काम करतात. म्हणजेच ती इस्ट्रोजेन, टेस्टोस्टेरॉन, इन्सुलिन आणि थायरॉईडसारख्या हार्मोन्सचे संतुलन बिघडू शकतात. जर एखादी व्यक्ती दिवसातून दोन ते चार वेळा असा चहा पीत असेल, तर कमी प्रमाणात का असेना, सातत्याने होणारा हा संपर्क शरीरावर घातक परिणाम करू शकतो. याचा परिणाम म्हणून हार्मोनल असंतुलन, वंध्यत्व, वजन वाढणं, थकवा, निद्रानाश, इन्सुलिन रेझिस्टन्स आणि टाईप-२ मधुमेह यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. काही तज्ज्ञांच्या मते यामुळे स्तन, प्रोस्टेट आणि थायरॉईड कॅन्सरचा धोकाही वाढू शकतो.

तज्ज्ञांच्या मते, मानवावरील मोठ्या प्रमाणावरील अभ्यासाला मर्यादा असल्या तरी प्रयोगशाळेतील आणि प्राण्यांवरील चाचण्यांमध्ये असं दिसून आलं आहे की, ही केमिकल्स 'ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस' वाढवून डीएनए खराब करू शकतात, ज्यामुळे कॅन्सर होऊ शकतो. अलीकडील संशोधन अधिक चिंता वाढवणारी आहेत. काही अभ्यासांत असं आढळलं आहे की, डिस्पोजेबल कपात दिलेल्या गरम पेयांमध्ये हजारो मायक्रोप्लास्टिक कण असू शकतात. आयआयटी खडगपूरच्या शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार दीर्घकाळ सिंगल-युज प्लास्टिक कप वापरल्याने मानवी शरीरात ग्रॅमच्या प्रमाणात प्लास्टिक जमा होऊ शकते तसेच परदेशातील संशोधनात मानवी मेंदूच्या ऊतींमध्येही मायक्रोप्लास्टिकचे अंश सापडले आहेत.

# रायगडात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार!



**नागोठणे :** नागोठणे येथील भाजप कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नतमस्तक होत अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख यावेळी करण्यात आला. शिवरायांचे विचार आणि आदर्श समाजापर्यंत पोहोचवण्याचा संकल्पही करण्यात आला. या कार्यक्रमाला रोहा तालुका महामंत्री आनंद लाड जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शहराध्यक्ष सचिन मोदी, गणेश घाग ज्ञानेश्वर शिर्के विभागीय अध्यक्ष, तालुका महिला अध्यक्ष अर्पणा सुट्टे, धनराज उमाळे, विवेक रावकर, उपस्थित होते.

**धाटाव :** सालाबादप्रमाणे यावर्षीही धाटाव गावात सोनारसिद्ध ग्रामस्थ, क्रीडा व महिला मंडळ यांच्या वतीने शिवजयंती उत्सव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध धार्मिक, सांस्कृतिक व पारंपरिक कार्यक्रमांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उत्सवाची सुरुवात किल्ले रायगड येथून शिवज्योत आणण्यासाठी प्रस्थान करून करण्यात आली. रायगडावरून आणलेली शिवज्योत धाटाव गावात आगमन झाल्यानंतर तिचे विधिवत पूजन ऋतिक जाधव व काश्मिरी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. एक धाव माझ्या राजासाठी या उपक्रमांतर्गत आयोजित धाव कार्यक्रमात युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

सकाळी शिवज्योत आगमनानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिषेक व विधिवत पूजा पार पडली. दुपारी महाराजांच्या पालखी सोहळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शिवभक्तांच्या जयघोषाने व भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण धाटाव गाव शिवमय झाले होते.

या कार्यक्रमावेळी रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस तुकाराम भोकटे, महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे उपजिल्हाध्यक्ष मुकेश शेठ भोकटे, धाटाव गावचे माजी अध्यक्ष चंद्रकांत मालुसरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा कार्यकर्ते राज रविंद्र रटाटे तसेच नरेश म्हसकर, मिथुन मालुसरे, योगेश म्हसकर, ज्ञानेश्वर जाधव, चिंतामणी रटाटे, दीपक पवार, नितेश जाधव, शुभम मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामस्थ, युवक व महिला मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.




## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that, Mr. Ahmed Afroz, have agreed to purchase and acquire bungalow No. 29 B, admeasuring 1700 Sq. Mtrs (build up), along with parking space, in the bungalow scheme project to be known as "Saif Enclave CHSL" situated at Survey No.94, Hissa No 1-C and Survey No. 94, Hissa No.- Plot No. 2 at village Kolkhe, within the limits of Grampanchayat Kolkhe, Taluka Panvel, Dist Raigad, 410 206, along with 10 Shares each of Rs. 50/- aggregating to Rs. 500/- under share Certificate No. 28, bearing Shares No. 271 to 280 (both inclusive) of the said "SAIF ENCLAVE CHSL" from Jozer M. A. Kurla wala.

All persons having any claim in respect of the above referred Property more particularly described in the Schedule hereunder written by way of sale, exchange, mortgage, gift, trust,charge, maintenance, inheritance, possession, lease, lien or otherwise of whatsoever nature are hereby requested to make the same known writing to the undersigned within a period of 7 days from the date hereof, failing which the calim of such person will be deemed to have been waived and /or abandoned or given up and the same shall not be entertained thereafter.

Dated this 20 day of Feb., 2026.

**Mr. Ahmed Afroz**

"J" Tower"Flat no 304"Cosmopolitan Cooperative Housing Soceity,"Takka Colony, Panvel, Navi Mumbai,"Maharashtra 410206




**खोपोली :** हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी या घोषाने खोपोली नगरी मध्यरात्री बाराच्या सुमारास दुमदुमून गेली. शिवजयंतीच्या निमित्ताने खोपोली शिळफाटा येथे आयोजित महाआरतीसाठी रात्री बाराच्या सुमारास पंचक्रोशीतील शिवप्रेमी मोठ्या संख्येने खोपोली शिळफाटा परिसरात जमले होते.

हाती भगवा ध्वज, शिवप्रतिमा, बाल शिवाजीच्या वेशात लहानगे, मावळ्यांच्या वेशभूषेत तरुणाई ,डोक्यावर भगवी टोपी, भगवा फेटा धारण केलेले शेकडो तरुण तरुणाई यामुळे वातावरण भारून गेले होते. रात्री बाराच्या ठोक्याला खोपोली नगराध्यक्ष कुलदीप शेंडे, मुख्याधिकारी पंकज पाटील, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेवक अनिल सानप, खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्यासह शेकडो, शिवप्रेमींच्या उपस्थितीत महाआरतीला प्रारंभ झाला. शिस्तबद्ध चाललेल्या महाआरती नंतर डीजेच्या तालात शिवरायांचा जयघोष सुरू झाला. यावेळी लाठीकाठी प्रात्यक्षिक देखील सादर करण्यात आले . महामार्गावरील वाहतूक वळून खोपोली पोलीस कर्मचारी आणि हेल्प फांऊडेशनच्या सदस्याने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

खोपोली शहरात विविध भागात त्याचप्रमाणे परिसरातही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या निमित्ताने नगरपरिषदेच्या लव्हेज या गावातही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या निमित्ताने पालखीचे आयोजन करण्यात आले होते गावात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिळफाटा येथील अश्वारूढपूर्ण पुतळ्यास नगराध्यक्ष,नगरसेवक व शिवप्रेमींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले अभिवादन



**मुरुड :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आदर्श कल्याणकारी राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६व्या जयंतीचे औचित्य साधून मुरुड– जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने नगरपरिषद कार्यालय, लक्ष्मीखार व दत्तवाडी येथील शिवाजी महाराज्यांच्या पुतळ्याला नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करुन शिवरायांना मानवंदना देण्यात आल्या नंतर राजे छत्रपती शिवाजी महाराज की जय ,जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव ,जय जिजाऊ , धर्मवीर संभाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या.

यावेळी मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव,प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आबंतेकर,सतेज निमकर,गटनेते पांडुरंग आरेकर, नगरसेवक मनोज भगत, आदेश दांडेकर, रुपेश पाटील ,मनिष विरूकुड,रुपेश रणदिवे, नगरसेविका प्रिता चौलकर, नगमाना खानजादे, यास्मिन कादिरी, देवयानी गुरव ,प्रमिला माळी, श्रध्दा अपराध, माजी नगरसेवक प्रमोद भायदे, अनिकेत वाजे,अनिकेत जगदाळे,सोनल पाटील,गजानन भुसाणे, प्रशांत दिवेकर, संजय बामगुडे,अरविंद गायकर,प्रशांत कासेकर,सुदेश माळी, उपस्थित होते

**मुरुड :** जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. ग्रिन हाऊसमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी मिळून या महान मराठा राजा यांना सन्मानित करणारा भावपूर्ण कार्यक्रम सादर केला.

सभेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन व कार्याची माहिती देणाऱ्या परिचयाने झाली. विद्यार्थ्यांनी त्याच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा उलगडा करणारे प्रभावी पोवाडे सादर केले. याशिवाय नृत्य सादरीकरणे आणि त्यांच्या जीवनातील महत्वाच्या घटनांचे लघु नाटक विद्यार्थ्यांनी सादर करून महाराजांच्या नेतृत्वगुण, धैर्य व देशभक्तीचे दर्शन घडवले.

प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत छत्रपती शिवाजी महाराजांचे अनुकरण करून त्यांच्या जीवनातील शिस्त, न्याय आणि आदर यांचा मार्गदर्शन घेण्याचे आवाहन केले. त्यांनी शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण आणि दूरदृष्टी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या चांगल्या गुणांचे अवलोकन करून प्रत्यक्ष जीवनात हे गुण अंगीकरणाचा प्रयत्न करावा असे सांगितले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा केल्या होत्या.





**चौक :** खालापूर तहसील कार्यालयाच्या वतीने आज कार्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करून मानाचा मुजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध सण व उत्सव आहे.हा सण स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त जगभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आज तहसील कार्यालयात तहसीलदार अभय चव्हाण यांनी शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, मानाचा मुजरा केला. यावेळी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही उपस्थित राहून मानाचा मुजरा केला.

**मुरुड :** कोकण उन्नती मित्रमंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरुड जंजिरा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून मुरुड नगरपरिषदेच्या वतीने भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला. या स्पर्धेत यजमान वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत बाजी मारली आहे. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुभाष म्हात्रे यांनी केले. ज्यामध्ये त्यांनी स्पर्धेमागचा मुख्य उद्देश आणि नगरपरिषदेच्या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. सदर स्पर्धा दोन वयोगटांत पार पडली. यामध्ये गट १ (इयत्ता ८ वी ते १० वी) आणि गट २ (इयत्ता ११ वी ते पदवी स्तर) अशा दोन विभागांत



विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत मुरुड मधील नामांकित नाज हायस्कूल, सर.एस.ए विद्यालय, अंजुमन इस्लाम महाविद्यालय आणि वसंतराव नाईक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आपले वक्तृत्व कौशल्य सिद्ध केले. स्पर्धेच्या निकालात वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

म.औ.वि.

ई निविदा सूचना क्रमांक ७८/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अनिवासी इमारतीची देखभाल व दुरुस्ती... पनवेल खांदा कॉलनी येथील नवीन प्रशासकीय इमारती मध्ये स्थापित केलेल्या विद्युत उपकरणांची दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १९,०५,७२०.०० |
| २ | रोहा येथील ६०० मि.मी. व्यासाच्या एचडीपीई जलवाहिनीवर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटरचा पुरवठा करून बसविणे. | ₹ १५,८२,४४७.०० |
| ३ | रोहा येथील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... रोहा येथील जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचारी वसाहत व अग्निशमन केंद्र कॉलनी येथे व्यायामशाळेची उपकरणे व बाह्य खेळाच्या उपकरणांची एक वर्षाच्या कालावधीकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १०,३६,४१९.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा औद्योगिक क्षेत्रातील ६३० मि.मी. सांडपाणी निःसारण वाहिनीवरील एअर व्हॉल्व्हसाठी आरसीसी चेंबर व जलशुद्धीकरण केंद्राच्या गेटवर वॉचमन केबिन तयार करणे. | ₹ १५,४६,६४७.०० |
| ५ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती ...... सांडपाणी मिश्रित पाण्याचे निर्जलीकरण करणे व ते सांडपाणी संकलन कक्षातील सांडपाणी उदंचीत करून सीईटीपीमध्ये टाकणे. | ₹ १५,४३,६८०.०० |
| ६ | अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ बांधण गावात पेझारी चेक पोस्टजवळ शुद्धजल गुरुत्व वाहिनी सेवा रस्त्याच्या कडेला पावसाळी गटार बांधणे. | ₹ ४०,००,०९४.०० |
| ७ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा येथे टँकरद्वारे बेकायदेशीर सांडपाण्याचा विसर्ग टाळण्यासाठी रोहा औद्योगिक क्षेत्रातील ६३० मि.मी. व्यासाच्या सांडपाणी निःसारण वाहिनीवरील खराब झालेले चेंबर्स पाडणे. | ₹ ११,०१,५७६.०० |
| ८ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रातील जलशुद्धीकरण केंद्र, अधिकारी व कर्मचारी वसाहत येथे येथे बसवलेल्या सीसीटीव्ही सिस्टीमची वार्षिक तत्वावर सर्वसमावेषक देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ९,३९,०००.०० |
| ९ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील शुद्ध जलउदंचन केंद्रातील डायलेक्ट्रिक उच्च शक्तीचे कंपोझिट साहित्याचा वापर करून केबल्सना संरक्षण देणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ४०,२४,४४०.०० |
| १० | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्राची देखभाल व दुरूस्ती...... रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्रातील खराब झालेली चेन लिंक नवीन कंपाउंड वॉलसह बदलणे. | ₹ १५,३२,५६०.०० |
| ११ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राच्या परिसरातील खराब झालेल्या कंपाऊंड भिंतीची दुरुस्ती करणे. | ₹ १५,८६,७९२.०० |
| १२ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती........ पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी संकलन प्रणाली व सांडपाणी निःसारण वाहिनीची देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३९,३४,३७३.०० |
| १३ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... पाताळगंगा जलशुद्धिकरण केंद्रातील फ्लॅश मिक्सर, स्टिरर व ॲक्सेसरीज बदलणे. | ₹ ३७,९५,२००.०० |
| १४ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड धरणाच्या यू/एस एलएचएस येथे धरणाच्या बॉडीजवळ दोन टप्प्यात गॅबियन भिंतीचे बांधकाम करणे, पिचिंग व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,३९,७९६.०० |
| १५ | तळोजा व टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... तळोजा टप्पा १ व २, ऐरोली सांडपाणी उदंचन केंद्रातील विविध ठिकाणी बसविलेल्या पंपांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ २७,४७,१५९.०० |
| १६ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती....... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्र इमारत व अग्निशमन केंद्राच्या परिसरातील लॉनची दैनंदिन देखभाल करणे. | ₹ ३१,५९,१४१.०० |
| १७ | रोह औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती....... रोह औद्योगिक क्षेत्रातील जलशुद्धिकरण केंद्राच्या इमारतीमधील स्टोअर रूम व पहिल्या मजल्यावर मेकॅनिकल मोबाईल कॉम्पॅक्टर स्टोरेज सिस्टमचा पुरवठा करून बसविणे. | ₹ ३८,९७,४१३.०० |
| १८ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्रात सीसीटीव्ही प्रणालीचा पुरवठा करून बसवणे व कार्यान्वित करणे. | ₹ १५,९८,३९४.०० |
| १९ | अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... मेसर्स आरसीएफ थळसाठी टाकलेल्या १३०० मि.मी. व्यासाच्या मृदु पालादी जलवाहिनीची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३९,९६,४८४.०० |
| २० | अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... अलिबाग कार्यालय परिसरातील लॉनची देखभाल व अलिबाग कार्यालय परिसरातील वृक्षांची, झुडपांची छाटणी दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीसाठी करणे. | ₹ ३२,०५,८७९.०० |
| २१ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... महाड येथील न्यू केटी वेअर जॅकवेल येथे कंपाउंड वॉल, नदीकाठच्या रस्त्यालगत भिंत व फ्लो मीटर चेंबरला पूर संरक्षण व्यवस्था पुरविणे. | ₹ १६,०४,६९६.०० |
| २२ | पाताळगंगा येथील नवीन व जुनी पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील शुद्ध जलउदंचन केंद्र व सांडपाणी निःसारण उदंचन केंद्राचे परिचालन करणे. | ₹ ३९,००,१६८.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २३/०२/२०२६ ते दिनांक ०९/०३/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २६/०२/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०४/०३/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# ‘माझी वसुंधरा’मध्ये नवी मुंबई मनपा द्वितीय

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या माझी वसुंधरा अभियान ५.०मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या अमृत शहरांच्या गटात ‘राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकाचे मानांकन’ प्राप्त झाले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या सातत्यपूर्ण यशस्वी वाटचालीत हा आणखी एक बहुमान लाभल्याबद्दल नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आनंद व्यक्त करीत सर्व नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन केले आहे.



पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित ‘माझी वसुंधरा अभियान ५.०’ हे दि. १ जून २०२४ ते दिनांक ३१ मार्च २०२५ या कालावधीत राबविण्यात आले. यामध्ये राज्यातील ४२२ नागरी स्थानिक संस्था व २७,८९५ ग्रामपंचायती अशा एकूण २८,३१७ स्थानिक संस्थांनी सहभाग घेतला होता. यात नवी मुंबई महानगरपालिकेने पंचतत्वांपैकी प्रत्येक तत्वाशी निगडीत थिमॅटिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून राज्यातील मोठ्या शहरांमध्ये व्दितीय क्रमांकाचा बहुमान प्राप्त केलेला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत केलेल्या कामाचे डेस्कटॉप मूल्यमापन व फिल्ड मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणांमार्फत करण्यात आले. या दोन्ही मूल्यमापनातील एकूण गुणांच्या आधारे माझी वसुंधरा अभियान ५.० मधील राज्यातील सर्वोत्तम स्थानिक स्वराज्य संस्थांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने द्वितीय क्रमांक पटकावून उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे.

‘माझी वसुंधरा अभियान ५.०’ अंतर्गत निर्सगाच्या पंचतत्वांना अनुरुप विविध उपक्रम व कार्यक्रम राबविण्यावर नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भर देण्यात आला असून त्यामध्ये व्यापक स्वरुपात लोकसहभाग राहील व या माध्यमातून पर्यावरण चळवळ उभी रहावी अशी भूमिका जपल्यामुळेच हा गौरव महानगरपालिकेस प्राप्त झाला असल्याचे सांगत महापौर राहुल सुजाता पाटील यांनी सर्व नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.०मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने भूमी थिमॅटिक क्षेत्रांतर्गत भूमी संवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि शाश्वत शहरी विकासाच्या दिशेने सातत्याने प्रभावी पावले उचलेली आहेत.

अभियानाच्या सर्व पाचही थिमॅटिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्यामुळे राज्यात मोठया शहरांच्या अमृत गटात नवी मुंबई महानगरपालिकेला व्दितीय मानांकनाचा बहुमान प्राप्त झालेला असून हा सर्व लोकप्रतिनिधी, महापालिका अधिकारी, कर्मचारी व पर्यावरणप्रेमी नागरिक यांच्या एकत्रित कार्याचा गौरव आहे, असे मत व्यक्त करीत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या पुढील काळात शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण आणि हवामानबदल प्रतिबंध या दिशेने नवी मुंबई महानगरपालिका सातत्याने पुढाकार घेत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

# उच्च प्रतीच्या बनावट मद्यावर कारवाई

## १९ लाख ३८ हजारांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील जुना मुंबई–पुणे हायवेवर पोयंजे आणि तुपगाव येथील गावाच्या हद्दीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने सापळा रचुन १९ लाख ३८ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



राज्य उत्पादन शुल्क विभागाने पनवेल तालुका पोलीस स्टेशन हद्दीत जुना मुंबई पुणे हायवेवर पोयंजे गावाच्या हद्दीत दारुबंदी गुन्ह्याकामी सापळा रचुन एका चारचाकी वाहनामध्ये वेगवेगळ्या ब्रँडच्या उच्च प्रतीच्या बनावट विदेशी मद्याच्या १२ बाटल्या, दोन मोबाईल व एक चारचाकी वाहन असा एकूण ५,६०,३९० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

यावेळी आरोपीकडे सदर अधिक तपास केला असता त्यांनी दिलेल्या माहितीनुसार खालापूर येथील तुपगाव येथील एका शेतातील घरामध्ये जाऊन छापा टाकला असता त्या ठिकाणी वेगवेगळ्या उच्च प्रतीच्या बनावट विदेशी मद्याच्या ५० बाटल्या विदेशी मद्याच्या १७ बाटल्या देशी मद्याच्या चार बाटल्या, दोन मोबाईल, रिकाम्या चाटल्या, बनावट बुचे, बनावट कागदी लेवले व इतर साहित्य असा एकूण पाच लाख ७८ हजार ४४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. सदर दोनही ठिकाणी मिजून एकूण १९ लाख ३८ हजार ८३० इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे बिन्नु कल्लूर, विनेश्वर एथ, एस, बिजू उरवा या इसमांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अन्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अनिल बिराजदार, राज्य उत्पादन शुल्क कर्ज विभाग निरीक्षक पी.एस. रासकर, निरीक्षक अजित बहरे, सुरेश झगडे, व्हाली भरणे, एम. पी. आगळे, सहाय्यक दुष्यनिरीक्षक निनाव पालवे, जवान ऋषिकेश भोगे, लक्ष्मण हाके, रोहित पाटील, अंकुश जज्ञर, धनश्री माळी यांनी कारवाई यशस्वीपणे केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिवजयंती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता स्टाफ वेल्फेअर व ग्रंथालय समितीच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वप्रथम शिवगर्जना व जयघोष करत वातावरण देशभक्तीमय करण्यात आले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी त्यांच्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी आणि न्यायनिष्ठ राज्यकारभाराचे महत्त्व अधोरेखित केले व त्यांनी विद्यार्थ्यांना महाराजांच्या आदर्शांचा अंगीकार करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले तसेच ग्रंथालय समितीच्या वतीने शिवचरित्रावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच सर्व सदस्यांनी कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमानाची भावना निर्माण झाली असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संदेश देण्यात आला.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात शिवजयंती उत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ.जी.नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमांतर्गत एफ.जी. नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक,समन्वयकडॉ दत्ता घोडके यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. या वेळी सुपरिचित युवाशिव व्याख्याते समाधानजाधव,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रमोद साळुंखे, प्रा.समिधा पाटील, समिती सदस्य प्रा. स्वाती हेलकर, प्रा.जानवी खारकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयात शिवजन्मोत्सव उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स (अधिकारप्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराजांचे दुर्ग आणि त्यांचे संवर्धन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत व्याख्यानासाठी शिवव्याख्याते सचिन ठाकूर, सहाय्यक शिक्षक, जनता विद्यालय, मोहोपाडा हे प्रमुख वक्ते लाभले होते.

इतिहास विभागप्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर व्याख्यानाचे प्रमुख वक्ते सचिन ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांच्या माध्यमातून शिवाजी महारांजाच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विवध पैलू उलगडले व त्या अनुषंगाने शिवचरित्रावर प्रकाश टाकला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गांचे संवर्धन करणे किती गरजेचे आहे याची समर्पक माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या इतिहास विभागप्रमुख डॉ. म्हात्रे, प्रा.भावेश भोईर व इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलनसमाधान साळवी (तृतीय वर्ष–इतिहास) या विद्यार्थ्याने केले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी.डी. आघाव यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापकवर्गाने शुभेच्छा दिल्या.

# मराठा वेशभूषा स्पर्धा



















# रेवदंड्यातील रो-रो जेट्टीच्या कामास प्रारंभ



**रेवदंडा : प्रतिनिधी**

पर्यटन वाढीसाठी सागरी वाहतुकीस राज्य शासन भर देत असून मांडवा रो-रो जेट्टीच्या धर्तीवर कोकण किनारपट्टीवर ठिकठिकाण अशा जेट्टी उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी रेवदंडा मोठे बंदर येथे कुंडलिका समुद्र खाडी मुखावर रो-रो जेट्टी उभारण्याच्या कामास प्रारंभ झाला आहे.

मुंबईहून थेट रत्नागिरीपर्यंत रो-रो सेवा भविष्यात शासन सुरू करण्याचा प्रयत्नात असून मांडवा रो-रो सेवेसाठी उभारलेल्याजेट्टी पाठोपाठ मुरूड तालुक्यातील काशिद व अलिबाग तालुक्यात रेवदंडा येथे रो-रो जेट्टी मेरीटाईम बोर्डाच्या कक्षेत बांधण्यात येत आहे. अंदाजे १२० कोटी रुपयांचा निधी या जेट्टीसाठी मंजूर झाला असून रेवदंड्यातील जेट्टीचे काम मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कन्स्ट्रशन कंपनीस देण्यात आले आहे. यामध्ये ब्रेक वॉटर तसेच रो रो जेट्टीचे बांधकाम करण्यात येत आहे. येत्या दोन वर्षाच्या कालावधीत हे काम पूर्ण करावयाचे आहे.

रेवदंड्यातील रो-रो जेट्टीमुळे मुरूड व अलिबाग तालुक्यातील पर्यटनात मोठी वाढ होणार आहे तसेच मुंबई, ठाणे ही शहरे कमीत कमी वेळेत सागरी मार्गाने जोडली जाणार आहे. भविष्यात रो-रो जेट्टीने परिसराचा बृहद विकास होईल अशी अपेक्षा आहे.

# पाली शासकीय विश्रामगृहात शिक्षक आणि आमदार संवाद; विविध विषयांवर विचारविनिमय



**पाली : प्रतिनिधी**

पाली येथील शासकीय विश्रामगृहात आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शिक्षकांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी नुकतीच भेट घेतली. या वेळी कोकणातील अनुदानित माध्यमिक शाळांवरील संच मान्यतेचा शासन निर्णय, शिक्षकांचे पगार, जुनी पेन्शन योजना, टप्पा अनुदान तसेच पे युनिटमार्फत अडकणाऱ्या थकीत बिलांबाबत शिक्षकांनी चर्चा केली.



८ जानेवारी २०१६च्या शासन निर्णयानुसार इयत्ता नववी-दहावीसाठी इंग्रजी, गणित, विज्ञान व समाजशास्त्र विषयांचे किमान शिक्षक आवश्यक असल्याची तरतूद कायम ठेवावी, अशी मागणी शिक्षकांनी केली. केवळ विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक मंजुरी दिल्यास शैक्षणिक दर्जा टिकणार नाही तसेच ग्रामीण भागातील अनेक अनुदानित शाळा 'शून्य शिक्षक' स्थितीकडे जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे कोकणासाठी स्वतंत्र संच मान्यतेचे निकष ठरवून पूर्वीप्रमाणे तुकडीआधारित शिक्षक संच मान्यता देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. बैठकीत शिक्षकांच्या पगाराचा प्रश्नही मांडण्यात आला. या संदर्भात आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी २० फेब्रुवारी रोजी अलिबाग येथे शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेऊन अडचणींबाबत चर्चा करणार असल्याचे सांगितले.

१ नोव्हेंबर २००५पूर्वी सेवेत रूजू झालेल्या शिक्षकांच्या जुनी पेन्शन योजनेबाबतही शिक्षकांनी भूमिका मांडली. या प्रश्नावर आमदार म्हात्रे यांनी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. यावर सकारात्मक परिणाम नक्कीच दिसून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

टप्पा अनुदानाच्या प्रतीक्षेत असताना काही शिक्षक सेवानिवृत्त होत असून, त्यांना नियमानुसार लाभ मिळावा, अशी मागणी करणारे निवेदन या वेळी देण्यात आले. या बैठकीस संघटनेचे अध्यक्ष दिलीप म्हसे, जिल्हा सचिव विनोद डाकी, संपर्कप्रमुख एल.एल ठाकरे आदी उपस्थित होते.

# मोरे महिला महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त प्रदर्शन

## शिवकालीन नाणी, शस्त्रे, परकीय चलन, किल्ल्यांच्या क्यूआर कोडचे सादरीकरण

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे महिला महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि.१८) शिवकालीन नाणी, शस्त्रे, परकीय चलन व किल्ल्यांच्या क्यूआर कोडचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. मोरे इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल सावंत यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

प्रदर्शनातील प्रमुख आकर्षण ठरले ते 'शिवराई होन' (शिवकालीन सोन्याची नाणी) आणि ब्रिटिशकालीन नाणी. स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय चलनातील बदलदेखील माहितीफलकांच्या साहाय्याने प्रभावीपणे या प्रदर्शनात मांडण्यात आले. परकीय चलन विभागात विविध देशांच्या चलनांचे नमुने प्रदर्शनात सादर करण्यात आले. यामुळे विद्यार्थिनींना जागतिक अर्थव्यवस्था आणि चलनप्रणालीचा परिचय झाला. किल्ले विभागात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून क्यूआर कोडद्वारे माहिती सादर करण्यात आली. याचबरोबर शिवकालीन शस्त्रांपैकी 'धोप तलवार' याचे प्रतिरूप प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. या शस्त्रांच्या माध्यमातून शिवाजी महाराजांची युद्धनीती व पराक्रम अधोरेखित करण्यात आला.

विद्यार्थिनी व प्राध्यापकांनी प्रदर्शनाला भेट देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिवजयंतीनिमित्त इतिहास विभागाने राबविलेला हा उपक्रम विद्यार्थिनींमध्ये इतिहासाविषयी अभिमान, अभ्यासवृत्ती व संशोधनाची आवड निर्माण करणारा ठरला, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. प्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयाच्या इतिहास विभागप्रमुख प्रा. माधुरी जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी द्वितीय आणि तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थीनींनी मोलाचे सहकार्य केले.



# नागोठणे विभाग पत्रकार असोसिएशनचे पुरस्कार जाहीर

## यशवंत कांबळे, प्रशांत शेडगे, परेश शिंदे मानकरी

**नागोठणे : बातमीदार**

रायगड प्रेस क्लबशी संलग्न असलेल्या नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनकडून देण्यात येणारे विविध पत्रकार पुरस्कार नुकत्याच झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आले आहेत.



यशवंत कांबळे प्रशांत शेडगे परेश शिंदे

कै. तात्यासाहेब टके ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार दै. रत्नागिरी टाइम्सचे दापोली प्रतिनिधी यशवंत बापू कांबळे यांना जाहीर करण्यात आला आहे. दै. पुण्यनगरीचे पनवेल प्रतिनिधी प्रशांत किसन शेडगे यांना उत्कृष्ट पत्रकार, तर दै. सागरचे माणगाव प्रतिनिधी व कार्यालय प्रमुख परेश दत्तात्रेय शिंदे यांना युवा पत्रकार पुरस्कार देण्यात येणार आहे. नागोठणे शहर व ग्रामीण विभागासह जिल्ह्यात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

नागोठणे ग्रामीण विभाग संघटनेचे मार्गदर्शक भाईसाहेब टके यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीला पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, सहसचिव राजेंद्र जोशी, सदस्य विनोद भोईर, दिनेश ठमके, सुनील कोकळे, राजेश पिंपळे, चेतन टके, सचिन नेरपगार, मंजुळा म्हात्रे, वर्षा सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

# श्रीवर्धनमधील मठाच्या स्मशानभूमीची निवारा शेड दुरूस्तीच्या प्रतीक्षेत

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीमध्ये असलेली निवारा शेड गेल्या अनेक दिवसांपासून पूर्णपणे मोडून गेली आहे. त्यावरील छप्पर तुटून पडून गेले आहे. नगर परिषद प्रशासनाने या शेडची दुरुस्ती लवकरात लवकर करावी, अशी मागणी होत आहे.

मठाची स्मशानभूमी या ठिकाणी श्रीवर्धन नगरपालिकेसह आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मेटकर्णी, आराठी परिसरात कोणाचेही मयत झाल्यास त्यांचा अंत्यविधी करण्यासाठी पार्थिव आणले जाते. गावातीलदेखील सर्वात जास्त अंत्यविधी याच स्मशानभूमीत केले जातात. त्या ठिकाणी तीन लाकडाने जाळण्याच्या शवदाहिन्या असून नगरपालिकेने गॅस शवदाहिनीदेखील बांधली आहे, पण या शवदाहिनीचा वापर होताना दिसत नाही, लाकडाने अंत्यविधी करण्याच्या शवदाहिन्यांचे लोखंडी पोल पूर्णपणे वाकून गेले आहेत. त्याचीही दुरवस्था झालेली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी मयतावर येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना किंवा वृद्ध लोकांना उन्हात किंवा पावसात उभे राहावे लागते.

# मुरूड शहरातील वाहतूक सुरळीत ठेवा

## दुकानदारांना पोलिसांचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात दिवसेंदिवस होत असलेली वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे आणि रायगड जिल्हा वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी मुख्य बाजारपेठेतील सर्व दुकानदारांना आवाहन केले आहे. दुकानात माल उतरविणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. याबाबत दुकानदारांनी योग्य दक्षता घेऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक कांबळे यांनी केले.



मुरुड बाजारपेठेतील काही दुकानांमध्ये माल पुरवठा करणारी वाहने सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी उभी करून माल चढविण्यात-उतरविण्यात येतो. यामुळे सतत वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना तसेच आपत्कालीन वाहनांच्या हालचालींना अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तोंडी सूचना देऊनसुद्धा हा प्रकार सुरुच असल्याने ही बाब गंभीर व कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे आम्ही अंतिम सूचना असून आपण कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक रस्त्यावर रहदारीच्या ठिकाणी माल उतरविण्यासाठी वाहने उभी करू नयेत. तुम्हाला मला उतरविण्याचे काम नियोजित जागेत व अत्यल्प वेळेत पूर्ण करावे. गर्दीच्या वेळेत माल चढविणे-उतरविणे पूर्णतः बंद ठेवावे. या सूचनांचे पालन न केल्यास मोटार वाहन कायदा १९८८ मुंबई पोलीस अधिनियम तसेच इतर लागू कायद्यानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई, वाहन जप्ती व दंड आकारण्यात येईल. याची गंभीर नोंद घ्यावी. वाहतूक सुरळीत ठेवणे हा सार्वजनिक हिताचा विषय असून यामध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. दुकानदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी लेखी पत्रकाद्वारे केले आहे. हे पत्रक वाहतूक पोलीस नाईक किशोर बठारे यांच्याकडून बाजारपेठेतील दुकानदारांना वाटप करण्यात आले आहेत.

# आधुनिक भुईमूग लागवडीचे शेतकऱ्यांना प्रशिक्षण

**रोहा : प्रतिनिधी**

कृषी विज्ञान केंद्र, रोहा जिल्हा रायगडमार्फत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत वरंध (ता. महाड) येथे एक दिवसीय आधुनिक भुईमूग लागवड तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षणवर्ग नुकताच आयोजित करण्यात आला.




प्रशिक्षण वरंधच्या कुंभारकोंडमधील आवड येथे घेण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमाला तुकाराम देशमुख, अध्यक्ष किसान क्रांती संघटना हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तसेच विशेष अतिथी म्हणून कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रीय सल्लागार समिती सदस्य स्वाती मालुसरे या उपस्थित होत्या. शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, डॉ. जीवन आरेकर, डॉ. राजेश मांजरेकर व डॉ. सचिन कारले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुनील कोंढाळकर यांनी सर्व मान्यवरांचे व उपस्थित मार्गदर्शक व शेतकरी बंधू-भगिनी यांचे स्वागत केले.

डॉ. प्रमोद मांडवकर यांनी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान या विषयी शेतकऱ्यांना माहिती दिली व भुईमूग लागवड करताना तंत्रज्ञानाचा वापर करण्याविषयी सखोल मार्गदर्शन केले. डॉ. सचिन कारले यांनी जमीन आरोग्य तपासणी व भुईमुगाचे खत व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले, तर भुईमुगातील पिकावर येणारे रोग व किडी यांची ओळख व करावयाच्या उपायोजना याविषयी डॉ. जीवन आरेकर यांनी माहिती दिली. नैसर्गिक शेतीमध्ये निविष्ठांचा वापर कशा प्रकारे करावा याविषयी सखोल मार्गदर्शन डॉ. राजेश मांजरेकर यांनी केले. यामध्ये प्रामुख्याने जीवामृत बिजामृत व दशपर्णी अर्क या निविष्ठा निर्मिती करून त्याचा वापर भुईमूग शेतीमध्ये कसा करावा या विषयी शेतकऱ्यांना अवगत केले.स्वाती मालुसरे यांनी शेतीमध्ये महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे अधोरेखित करताना सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष असल्याने सर्व शेतकरी बांधवांना व भगिनींना त्यांनी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय मार्गदर्शनात तुकाराम देशमुख यांनी शेतकऱ्यांनी शेती अधिक फायद्याची कसे होईल व शेतकऱ्यांना चांगला हमीभाव कसा मिळेल या विषयी आपले मत व्यक्त केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात वरंध, बारसगाव, गावडी, कुंबे शिवतर व पिंपळदरी येथील शेतकरी व महिला सहभागी झाल्या होत्या. प्रशिक्षणानंतर शेतकऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देऊन पीक पाहणी केली व प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाची होण्याकरिता कृषी विज्ञान केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ.प्रमोद मांडवकर, त्यांचे सहकारी व वरंध कुंभारकोंड येथील ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# सांस्कृतिक, क्रीडा स्पर्धेत मानिवली शाळेचे सुयश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वंजारपाडा येथे असलेल्या माथेरान व्हॅली स्कूलमध्ये सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील तीन गटांमध्ये मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी कमाल केली.



माथेरान व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल वंजारपाडा येथे सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धा रंगली. शिक्षण विभागाच्या दहिवली माले या केंद्रातील सर्व शाळांना स्पर्धेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. सांस्कृतिक आणि क्रीडा अशा विविध स्पर्धेत तीनशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानिवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

वक्तृत्व स्पर्धेतील मोठ्या गटात पूजा लहू डायरे हिने प्रथम क्रमांक पटकावला. दोरी उडी क्रीडा स्पर्धेत समृद्धी केशव गवळी हिने दुसरा, चमचा लिंबू क्रीडा स्पर्धेत दुर्वा रघुनाथ डायरे हिने दुसरा क्रमांक पटकावला. सामूहिक स्पर्धेतदेखील विद्यार्थ्यांनी तीन सांस्कृतिक प्रकारात तिसरे क्रमांक पटकावले. त्यात नाट्य स्पर्धा (मोठा गट), समूह नृत्य (लहान गट), गीतगायन (मोठा गट)सह स्नेहल मनिष पाटील हे विजेते ठरले.

